# म्हस्केवाडीत सायबर सुरक्षिततेबाबत महिलांना मार्गदर्शन

## ग्रामपंचायत व बाळासाहेब जाधव महाविद्यालयाचा उपक्रम

अळकुटी : प्रतिनिधी

सायबर गुन्हेगारी ही नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधाचा एक प्रमुख दुष्परिणाम असून जागतिक समस्या आहे. अशा गुन्ह्यांत मोठ्या संख्येने महिला बळी पडतात. त्यांच्या पूर्ण संरक्षितेलाच धोका असून अशा प्रकारच्या सायबर गुन्ह्यांचा महिलांनी सामना करण्यासाठी म्हस्केवाडी येथे ग्रामपंचायत व मा. बाळासाहेब जाधव महाविद्यालय आळे क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षितता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



सायबर सुरक्षिततेबाबत महिलांना मार्गदर्शन करताना मार्गदर्शक विद्यार्थी जयश्री भोसले, रोहन टाकळकर, सरपंच आशा पानमंद व उपस्थित महिला ( छाया : मंगेश पारखे)

म्हस्केवाडी येथील श्री गणेश मंदिर सभामंडपात आयोजित केलेल्या कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शन करताना मा. बाळासाहेब जाधव महाविद्यालय आळे येथील संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी जयश्री भोसले व रोहन टाकळकर म्हणाले की, सायबर क्राइम हा असा गुन्हा आहे ज्यामध्ये संगणक आणि नेटवर्कचा समावेश असतो. जेव्हा एखादा गुन्हा इंटरनेटवर किंवा इंटरनेटद्वारे होतो तेव्हा त्याला सायबर क्राइम म्हणतात. यामध्ये ईमेल स्पॅम, फिशिंग, पायरेसी, डेटा चोरी, हॅकिंग तसेच ओटीपी, मोबाईल गेम्स, सोशल मिडीयाद्वियाद्वारे फसवणूक व नोकरीबाबतीत फसवणूक अशा गुन्ह्यांचा समावेश होतो.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होताना आढळत आहे. सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी कठोर कायदे करणाऱ्या मोजक्या देशांमध्ये भारताचा समावेश असला तरी सायबर क्राइम दिवसेंदिवस वाढत असून प्रत्येक इंटरनेट वापरकर्त्यांसाठी या सायबर गुन्ह्यांविषयी माहिती असणे फार महत्वाचे आहे तसेच प्रत्येकाने सोशल मिडीयाचा वापर करताना बँक खाते क्रमांक, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड, इंटरनेट बँकिंग तपशील, पासवर्ड, ओटीपी तसेच वैयक्तिक माहिती गोपनीय ठेवणे गरजेचे असून विशेषतः महिलांनी सोशल मिडीया कसा हाताळावा व सायबर सुरक्षिततेबाबत काळजी कशी घ्यावी याविषयी देण्यात आली. यावेळी सरपंच आशा किरण पानमंद, सविता म्हस्के, सारिका म्हस्के, पुजा गोरडे, जननी महिला ग्रामसंघाच्या सदस्या तसेच गावातील सर्व महिला उपस्थित होत्या.याप्रसंगी संगणकशास्त्र विभागातील विद्यार्थी जयश्री भोसले व रोहन टाकळकर यांचा सरपंच आशा पानमंद व उपस्थित महिलांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.